

# ३. गायन

## ३.१ अंकगीत



१ २ ३ ४
सर्वांना आवडतात फुलं फार
५ ६ ७ ८
स्वच्छ सुंदर नदीचा काठ
९ १० ११ १२
गार गार सुटला वारा
१३ १४ १५ १६
झाडावर झाले पक्षी गोळा
१७ १८ १९ २०
पहा सुंदर मोरपीस


गायनामध्ये स्वरांच्या साहाय्याने संगीतमय ध्वनींची निर्मिती केली जाते. विविध वाद्यांच्या साहाय्यानेच गायन केले जाते असे नाही तर सहज व स्वत:च्या आनंदासाठी केलेल्या गुणगुणण्याला देखील गायन असे म्हणता येईल. सरावासाठी गाणी म्हणून घ्यावीत.



## ३.२ अक्षरगीत

अ आ आ आ आ
हातातला फुगा फुगवून पहा
इ ई ई ई ई
फुग्याची नक्षी बघना ताई.
उ ऊ ऊ ऊ ऊ
फुग्यावर आपण बसून जाऊ

## ३.३ गोष्टीरूप गीत



### ससा आणि कासव

एक होता ससा
एक होतं कासव.
ससा होता चपळ
कासव होतं हुशार.
ससा म्हणतो शर्यत लावू
कासव म्हणाला धावून पाहू.
सशाने ठोकली धूम
कासव झाले घामाघूम

आजूबाजूला गवत मस्त
सशाने केले खाऊन फस्त
कासव चाले हलवीत मान
सशाने घेतली झोपेची तान
कासवाने जिंकली शर्यत छान
सशाने घातली खाली मान

R9EVHI

